## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ९५ सन २०२४ मधील निशाणी २९ खालील आदेश

लक्ष्मीकांत मनोहर पाटील व.२
वि.
उप अभियंता, महा. औद्यो. विकास महामंडळ व.३

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ याने त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत व विना म्हणणे आदेश रदद करुन त्याची कैफियत व म्हणणे दाव्याचे कामी सामिल करुन घेणेस परवानगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र. ३ यांचे कथन असे की, वादीने सदरहु दावा प्रतिवादी विरुध्द कायम ताकिदीकरीता आणि आज्ञार्थी ताकिद होण्यासाठी दाखल केला असून सदर दाव्या कामी दावा समन्स बजावणी होऊन प्रतिवादी क्र. ३ हे न्यायालयात हजर झाले असून त्यांचे विरुध्द मुदतीत कैफियत न दिल्याने नि. १ वर विना कैफियत व विना म्हणणे असा आदेश पारित झाला आहे तो रद्द होऊन मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी खोटा व खोडसाळ दावा दाखल करुन प्रतिवादी यांना त्रासात व खर्चात धातले आहे. प्रतिवादी क्र. ३ हे प्राधिकरण असल्यामुळे प्रशासकीय मान्यता व त्या अनुषंगाने दावा मिळकती संबंधीत आवश्यक ती कागदपत्रे जमवाजमव करुन मुदतीत आपली कैफियत व म्हणणे न्यायालयात दाखल करु शकले नाहीत, परिणामी त्यांचेविरुध्द प्रस्तुत विना कैफियत व विना म्हणणे आदेश पारित झाला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे दाखल होणे आवश्यक आहे अन्यथा त्यांची न्याय बाजु कोर्टासमोर येणारी नाही. याऊलट, कैफियत व म्हणणे दाखल झालयास वादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही, तर दावा गुणदोषावर चालवून सुलभ अंतिम न्यायनिर्णय होणारा आहे. सबब, अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादीने केली आहे.

०३. वादीने सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे.

०४. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी व प्रतिवादी यांचा युक्तीवाद

ऐकला.

**०५**. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना दावा समन्सची बजावणी होवून वकिलांमार्फत हजर झाले. परंतू, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम १ अन्वये प्रतिवादी यांस उचित संधी देवून देखील त्यांनी विहीत मुदतीत आपली कैफियत व म्हणणे दाखल केलेली नाही. प्रतिवादी क्र. ३ हे प्राधिकरण असल्यामुळे प्रशासकीय मान्यता व त्या अनुषंगाने दावा मिळकती संबंधीत आवश्यक ती कागदपत्रे जमवाजमव करुन मुदतीत आपली कैफियत व म्हणणे न्यायालयात दाखल करु शकले नाहीत असे कारण प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केले आहे. सदर कथनाच्या पुष्ठयर्थ त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा याकामी हजर केला नाही. सबब, त्यांनी दिलेले कारण हे संयुक्तीक नाही. तरीही नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना दाव्यामध्ये आपली लेखी कैफियत व म्हणणे दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे योग्य होईल. कारण वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द कायम ताकिदीकरीता व अज्ञार्थी ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे आवश्यक पक्षकार असून न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस आपली कैफियत व म्हणणे मांडण्याची संधी देणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे प्रतिवादीची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर घेतल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. तसेच प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्याने वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही या निर्णयाप्रत मी आलो आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: आदेश :–**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ३ यांची कैफियत व म्हणणे पटलावर दाखल करुन घेणेत येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.05.07 17:59:56 +0530

कुडाळ. (पी. आर. ढोरे)

दिनांक : ०६/०५/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ.